Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण संवर्धनासाठी शिक्षण

प्रा. डॉ. सुभाष आर. भालेराव,
सहयोगी प्राध्यापक,
ॲड. व्ही. एच. शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक – 2

**✻ प्रास्ताविक:-**

आजच्या जगातील अनेकविध समस्यांपैकी प्राधान्याने व तातडीने लक्ष पुरविले पाहिजे अशी एक समस्या म्हणजे 'पर्यावरण संरक्षण' होय. शासनापासून ते सामान्य नागरिकापर्यंत अनेक जण/संस्था पर्यावरणाच्या स्वास्थ्यासाठी कार्यरत आहेत. पर्यावरण शिक्षण पर्यावरणाचे संतूलन राखणे व पर्यावरणासंबंधी जाणीवजागृती निर्माण करणे, याबाबतीत शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असू शकते आणि असली पाहिजे.

पुरातन काळापासून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. ऋषी मुनिंनी निसर्गाचे संवर्धन, संरक्षण, संतुलन यावर सातत्याने भर दिलेला आहे. पर्यावरण या संज्ञेचा जन्म झाला नव्हता तरी संबोध तोच अभिप्रेत होता. असे असतांना आज पर्यावरण संरक्षणाचे, संवर्धनाचे महत्त्व वाढलेले आहे. अल्बर्ट आईनस्टाईनच्या शब्दात- ''हे केवळ मानवाच्या अचाट मूर्खपणामुळे''. खरोखरच मानवाने त्याची विचारशक्ती अशा प्रकारे वापरली आहे की, त्यामुळेच अनेक पर्यावरणीय समस्या उद्‌भवल्या आहेत. सध्याचे पर्यावरण प्रदूषित असून मानवासहित सर्व सजीवांना ते घातक आहे. अशा परिस्थितीमुळेच पर्यावरण शिक्षण, आज अधिकाधिक महत्त्वाचे आणि गरजेचे साधन बनले आहे.

**✻ पर्यावरण शिक्षणाची पार्श्वभूमी :-**

''अनेकविध कृती आणि तेथील लोकसमूदाय यांच्यातील आंतरक्रिया म्हणजेच पर्यावरण!''

1950 साली लंडनमध्ये पसरलेल्या विषारी धुक्याने चाळीस हजाराहून अधिक व्यक्तिंचा बळी घेतल्यानंतर पर्यावरणविषयक जागृतीस सुरवात झाली. 1950 ते 70 च्या दरम्यान हवा, पाणी, नदया, जंगले, वन्य जीवन समूह इत्यादींबाबत असे अनेक प्रसंग घडले की, ज्यामुळे मानवी पर्यावरणातील वाढत्या प्रमाणातील वैचित्र समोर आले.

''पर्यावरणीय प्रदूषणावरील ब्रिटिश रॉयल कमिशनच्या पहिल्या अहवालात असे नमूद करण्यात आले की, पर्यावरणासाठी सर्वोत्तम विमा म्हणजे, लोकांच्या वतीने हवा, पाणी व जमिनीवर ऱ्हास थांबविण्यासाठी वचनबद्ध होणे.''

अमेरिकेचे अध्यक्ष थिओडर रुझवेल्ट यांनी व्हाईट हाऊस येथे बोलाविलेल्या राज्यपालांच्या एका सभेत

IIJS Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

अमेरिकेच्या धोरणात पर्यावरणाच्या जतनास अग्रक्रम देण्याचा ठराव संमत झाला. निसर्गसंरक्षणाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेने जवळजवळ 1960 च्या सुमारास पर्यावरण शिक्षणाच्या आवश्यकतेचा मुद्दा मांडला. भारतात देखिल कोठारी आयोगाच्या शिक्षणविषयक अहवालात (1964-66) आणि नंतर 1975 मध्ये 'दशवर्षिय शालेय अभ्यासक्रम' या मार्गदर्शक निबंधामध्ये (Approach paper) पर्यावरण शिक्षणावर विशेष भर दिला होता.

स्वीडनमध्ये स्टॉकहोम येथे 1972 मध्ये यूनायटेड नेशन्सतर्फे भरवण्यात आलेल्या 'मानवी पर्यावरण' या विषयावरील परिषदेमुळे पर्यावरण शिक्षणाला जागतिक पातळीवर मान्यता प्राप्त झाली. 1972 सालची स्टॉकहोम परिषद जनजागृतीची खूपच महत्त्वपूर्ण ठरली. स्टॉकहोम जाहिरनाम्याला मानवी पर्यावरणाचा मॅग्नाकार्टा असे संबोधण्यात आले.

**✽ पर्यावरण शिक्षण :-**

''पर्यावरण शिक्षण म्हणजे मानवाचा त्याच्या नैसर्गिक व मानवनिर्मित परिसराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणारी एक प्रक्रिया होय.''

मूल्यांची ओळख आणि मानव त्याची संस्कृती, त्याचा परिसर यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्यासाठी, त्याची दखल घेण्यासाठी आवश्यक ती कौशल्य व अभिवृत्ती विकसित करण्यासाठी संबोधाचे स्पष्टीकरण असणारी प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

जागतिक पर्यावरण आयोगाने (World Commission on Environment Development - WCED) यांनी पुढीलप्रमाणे दिलेली व्याख्या,- भावी पिढयांची, स्वतःच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेला बाधा न आणता वर्तमानकालीन गरज म्हणजे, शाश्वत विकास.

पर्यावरण शिक्षण हे पर्यावरणाभोवती केंद्रित झालेले असते. पर्यावरण त्याच्या अभ्यासाचे, उपयोजनाचे व कृतीचे क्षेत्र आहे. समाजाच्या कल्याणासाठी पर्यावरणासंबंधी ज्ञान प्राप्त करणे. पर्यावरणात सुधारणा करणे, त्यात बदल करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

**✽ पर्यावरणात बिघाडः-**

स्वतःच्या सुखाच्या शोधात माणूस इतका स्वार्थी व क्रूर बनला की, त्याला स्वतः पलिकडे काहीही दिसेनासे झाले आहे. इतर प्राण्यांची संख्या त्याने भरमसाट कमी केली. मात्र स्वतःच्या जातीच्या संख्येवर कुठलाही अंकूश ठेवला नाही. रस्ते, शेती, इमारती यासाठी जंगले तोडून त्याने वन्य प्राण्यांना बेघर केले. स्वतःच्या सुखासाठी मानवाने

इतरांची पर्वा कधीच केली नाही. परंतु मानवाच्या प्रगतीची ही दुधारी तलवार आज मानवावरच उलटू पहात आहे. याची जाणीव मानवालाही झाली आहे. प्रदुषण आणि इंधनसमस्या यासारख्या मोठ्या प्रश्नांना आता मानवाला सामोरे जावे लागणार आहे. म्हणून पर्यावरण शिक्षणाची गरज ही काळाची गरज बनली आहे.

पर्यावरणात हवा, पाणी, जमीन, वनस्पती, प्राणी व सूर्यप्रकाश या सर्वांचा समावेश होतो. मानवाने यापैकी कोणतीच गोष्ट प्रदूषित करण्याची बाकी ठेवलेली नाही आधुनूकीकरणाच्या हव्यासापोटी अनेक कारखाने उभे राहिले. त्यातून अनेक विषारी वायू हवेत मिसळले गेले. त्यांना निसर्गाच्या चक्रातून पार करता येत नाही, म्हणून ते तसेच राहतात व आपला दुष्परिणाम दाखवितात. कारखान्यातून बाहेर पडणारे विषारी व रासायनिक पाणी शुद्ध जलाशयात सोडले जात असल्यामुळे पाणी अशुद्ध तर झालेच परंतु पाण्याची नैसर्गिक जलशुद्धी करणाची क्षमतासुद्धा अपूरी पडू लागली आहे. उत्पादनवाढ ही मानवाची स्वार्थी गरज भागविण्यासाठी उपलब्ध कमी जमिनीच्या क्षेत्रातून जास्तीत जास्त उत्पन्न काढण्याचा मानव प्रयत्न करीत आहे. त्यासाठी रासायनिक खतांचा बेसुमार वापर वाढला आहे. त्यातून शेतजमीन तर नापिक झालीच पण पाण्याचे साठेही प्रदुषित होऊ लागले आहे.

किरणोत्सारी प्रदुषके हवेत दीर्घकाळ टिकतात ते वनस्पतींवर परिणाम करतात व ह्या वनस्पतींचा अन्न म्हणून उपयोग केल्यास त्याचे दुष्परिणाम खाणाऱ्या प्राण्याला भोगावा लागल्याशिवाय गत्यंतर नसते. हवेतील प्रदुषणामुळे ओझोनचा थर विरळ होऊ लागला आहे. म्हणून सूर्याची अतिनिल किरणे पृथ्वीवर येऊन त्याचे भयानक परिणाम होतील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तात्पर्य निसर्ग पर्यावरणाचा तोल बिघडलाय त्यातूनच पर्यावरण शिक्षणाच्या गरजेची जाणीव होते.

**✻ पर्यावरण संवर्धन :-**

✻संवर्धन – पर्यावरण संवर्धन याचा अर्थ जमीन (मृदा) पाणी, हवा, खनिजे व अन्य नैसर्गिक स्त्रोतांचा जपून वापर करणे, किंवा पुढे जाऊन असेही म्हणता येईल की, शक्य तेवढी दूरदृष्टी वापरून व निसर्गाशी सहकार्य करून मानवाने पर्यावरणाचा (निसर्गाचा) केलेला पूर्वनियोजित वापर म्हणजे पर्यावरण संवर्धन.

✻संवर्धनाची गरजः– जपणूक हा संवर्धनाचा एक भाग आहे. परंतु खरे तर संवर्धन हे नुसत्या जतनापेक्षाही काहीतरी अधिकच आहे. नैसर्गिक स्त्रोतांचे संवर्धन म्हणजे देखील त्यांचे रक्षण व त्यांच्या दर्जात, वैविध्यात व पुरवठ्यात घडवून आणलेली सुधारणा. मृदा, जल, हवा, उर्जा, वने हा आपला अमूल्य ठेवा आहे. आगामी पिढयांसाठी तो राखून ठेवला पाहिजे. या अफाट नैसर्गिक संपदेचे विश्वस्त म्हणून कार्यरत राहून या नैसर्गिक संपत्तीची काळजी घेतली पाहिजे.

संवर्धनाची क्षेत्रेः–

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015



वरीलप्रमाणे जलसंवर्धन, खनिजसंवर्धन, मृदासंवर्धन, जैववैदिक संवर्धन यांचे संवर्धन करण्याची गरज आहे. जलसंवर्धन केले नाही तर दुष्काळ, अन्नधान्य टंचाई, फळफळावळ टिकविणे उर्जा या संकटांना तोंड दयावे लागेल. त्यासाठी जलसंवर्धन करणे गरजेचे आहे.

मृदासंवर्धन करणे ही महत्त्वाचे आहे. जमिनीची धूप होणे, सतत कायम कायम तीच तीच पिके घेणे, निरनिराळ्या प्रकारच्या रासायनिक खतांचा वापर, खार जमिन किंवा अतिपाऊस यामुळे मृदासंवर्धन करणे महत्त्वाचे आहे.

खनिजांचा साठा संपूष्टात आला आहे. लोखंड, ॲल्यूमिनियम, यूरेनियम, सोने, खनिजतेले यांचा साठा आता संपूष्टात आलेला आहे. परंतु पुढे काय? हे प्रश्नचिन्ह तयार होत आहे मग खनिज संवर्धन होणे गरजेचे आहे.

जैव वैविध्य म्हणजे विविधता. जैववैविध्य म्हणजे प्राणी, वनस्पती व इतर प्रजातीमधील विविधता. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत काही प्रजाती नष्ट झाल्या परंतु गेल्या दोन शतकात लोकसंख्येत व लोकांच्या जीवनशैलीच्या बदल्याच्या वेगात घडून आलेली प्रचंड वाढ, पृथ्वीवरील इतर प्रजातींच्या अस्तित्वावर ताण निर्माण करणारी गोष्ट ठरली आहे. इतर प्रजाती धोकादायक गतीने नष्ट होत आहेत.


वनसंवर्धन दोन प्रकारे करता येईल. एक म्हणजे लोकसहभागातून व दुसरे म्हणजे कायमच्या मदतीने दोन्ही पद्धती ताबडतोब व योग्य रीतीने राबविल्यास वनसंवर्धनाचे उद्दिष्ट सफल होईल.

**✻ पर्यावरणाचे पूनर्भरण :-**

पर्यावरणाचा तोल सांभाळण्यासाठी व पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी पुढील अकरा आज्ञा (Eleven Command Meats) काही अथवा सर्वांचे परिस्थितीनुरूप पालन करणे गरजेचे आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**एकादश आज्ञावली**




वरीलप्रमाणे पर्यावरणाचे पूनर्भरण करता येईल व त्यायोगे पर्यावरणाचे संवर्धन करता येईल.

**संदर्भः-**

1. हेमलता (डॉ.) पारसनीस (2006) पर्यावरण शिक्षण
2. जयश्री (डॉ.)बहुलीकर (2006)
3. डी (डॉ.) आर. कुलकर्णी (2006) पर्यावरण शिक्षण
4. संस्कार नियतकालिक (2006) पर्यावरण विशषांक